निर्यातीचा विक्रम!

४.६ टक्क्यांनी वाढून ८६,३११ कोटी डॉलरवर

पीटीआय, नवी दिल्ली

जागतिक आर्थिक अनिश्चितता असूनही, देशाची वस्तू आणि सेवांची निर्यात सरलेल्या २०२५-२६ आर्थिक वर्षात ४.५९ टक्क्यांनी वाढून ८६,३११ कोटी डॉलर या आतापर्यंतच्या उच्चांकावर नोंदवली गेली, असे वाणिज्य मंत्रालय आणि रिझर्व्ह बँकेकडून बुधवारी प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीने स्पष्ट केले. आधीच्या २०२४-२५ आर्थिक वर्षात ८२,५२६ कोटी डॉलर निर्यात झाली होती.

गेल्या आर्थिक वर्षात वस्तू निर्यात ०.९३ टक्क्यांनी वाढून ४४,१७८ कोटी डॉलरवर पोहोचली, जी २०२४-२५ मध्ये ४३,७७० कोटी डॉलर इतकी होती. तथापि, यंदा सेवा निर्यातीत सर्वात लक्षणीय वाढ झाली आहे. २०२४-२५ मधील ३८,७५५ कोटी डॉलरच्या तुलनेत, २०२५-२६ मध्ये सेवांची निर्यात ८.७१ टक्क्यांनी वाढून ४२,१३२ कोटी डॉलरच्या आतापर्यंतच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचली आहे.

जागतिक अनिश्चितता आणि वस्तूंच्या व्यापारातील आव्हाने असूनही, भारताच्या वस्तू निर्यातीने आपली वाढीची गती कायम राखली असून, एकूण निर्यातीमध्ये सेवांच्या निर्यातीने महत्त्वपूर्ण योगदान दिले, असे वाणिज्य मंत्रालयाच्या अधिकाऱ्याने ही आकडेवारी जाहीर करताना सांगितले.

सेवा निर्यातीतील मोठी वाढ माहिती-तंत्रज्ञान (आयटी), वाणिज्य उपाययोजना आणि व्यावसायिक कौशल्ये यांसारख्या सेवांना असलेली जागतिक मागणी वाढत असल्याचे अधोरेखित करते, असेही त्या अधिकाऱ्याने पुढे नमूद केले.

व्यापार तुटीचाही उच्चांक

निर्यातीतील या विक्रमी वाढीसोबतच आयातीतही वाढ झाल्याचे दिसून आले. एकूण आयात (वस्तू आणि सेवा) मागील वर्षातील ९१,९९२ कोटी डॉलरवरून वाढून, २०२५-२६ मध्ये ९७,९६५ कोटी डॉलरवर पोहोचली. एकूण आयातीतील ६.४९ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली असून, आयातीचा हा वाढीचा वेग निर्यातीच्या वाढीपेक्षा अधिक राहिल्यामुळे देशाची एकूण 'व्यापार तूट' अधिकच रुंदावत, ११,६५४ कोटींच्या उच्चांकावर पोहोचली आहे. केवळ वस्तूंची आयात ७.४६ टक्क्यांनी वाढून ७७,४९८ कोटी डॉलरवर पोहोचली, तर सेवांची आयात ३ टक्क्यांनी वाढून २०,४६७ कोटी डॉलर झाली आहे.

प्रत्येक तिमाही सर्वोच्च वाढीची

निर्यातवाढीतील हा टप्पा केवळ त्याच्या विक्रमी मूल्यामुळेच नव्हे, तर सरलेल्या २०२५-२६ या वर्षाच्या चारही तिमाहींमध्ये प्रत्येकी स्वतंत्रपणे निर्यातीची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी नोंदवली गेल्यामुळेही अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला आहे.

'सेन्सेक्स'ची ९४० अंशांची कमाई

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

युद्धविरामासाठी वाटाघाटीत प्रगती

गुंतवणूकदारांच्या झोळीत ६ लाख कोटींची श्रीमंती

बाजारातील बुधवारच्या सत्रातील सकारात्मक तेजीच्या परिणामी बुधवारी गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ५.९९ लाख कोटी रुपयांची वाढ झाली. मुंबई शेअर बाजारातील सूचिबद्ध कंपन्यांचे बाजारभांडवल ५.९९ लाख कोटींनी वधारून ४७२.८० लाख कोटींपुढे (४.९७ ट्रिलियन डॉलर) पोहोचले. अमेरिका-इराण युद्ध समाप्तीच्या दिशेने पुढे जात असल्याने गुरुवारच्या सत्रात देखील बाजारात चैतन्य कायम राहण्याची शक्यता आहे.

मुंबई: युद्ध संपवण्यासाठी सुरू असलेल्या इराणशी करावयाच्या करारासंबंधी वाटाघाटींमध्ये प्रगती झाल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केल्यानंतर, खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमतीत मोठी घसरण झाली. याचा सकारात्मक परिणाम म्हणून बुधवारी प्रमुख निर्देशांक 'सेन्सेक्स'ने घसरणीला मागे टाकत, ९४० अंशांची जोरदार मुसंडी मारली.

सत्राच्या उत्तरार्धात गुंतवणूकदारांनी लावलेल्या खरेदीच्या सपाट्याने सेन्सेक्स ९४०.७३ अंशांनी (१.२२ टक्के) वधारला आणि ७७,९५८.५२ या पातळीवर दिवसअखेर बंद झाला. सत्रादरम्यान, सेन्सेक्समध्ये १,००४.९९ अंशांची कमाई करत ७८ हजारांपुढील उच्चांकी पातळीला स्पर्श केला होता. अर्थात दिवसांतील नीचांकी पातळीपासून सेन्सेक्सने तब्बल १,२५० अंशांची उसळी मारली. दुसरीकडे निफ्टी २९८.१५ अंशांनी (१.२४ टक्के) वधारून २४,३३०.९५ या पातळीवर बंद झाला. युद्धविरामाच्या वाटाघाटींमध्ये प्रगती झाल्याचा दावा करत, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझ सामुद्रधुनीमधून जहाजांना सुरक्षा पुरवणाऱ्या 'प्रोजेक्ट फ्रीडम'ला स्थगिती देत असल्याची घोषणा केली. इराणच्या प्रतिनिधींशी अंतिम करार करण्याच्या दिशेने पाऊल पुढे पडल्याचे ट्रम्प यांनी समाजमाध्यमावर सांगितले. पाकिस्तान आणि इतर देशांच्या विनंतीवरून, तसेच इराणविरुद्धच्या मोहिमेदरम्यान मिळालेले लष्करी यश आणि अंतिम कराराच्या दिशेने झालेली मोठी प्रगती या बाबी विचारात घेऊन, हा निर्णय घेतला असल्याचेही ट्रम्प म्हणाले. होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे तिथे अडकलेल्या जहाजांना सुरक्षित स्थळी पोहोचवण्यासाठी त्यांना संरक्षण देण्याच्या उद्देशाने अमेरिकी नौदलाने 'प्रोजेक्ट फ्रीडम' सुरू करण्यात आले होते. जागतिक तेल बाजाराचा मापदंड मानले जाणारे 'ब्रेंट क्रूड' या घटनाक्रमामुळे, ८ टक्क्यांनी घसरून पिंपामागे १०१.१ डॉलरवर घसरले. भारतासारख्या, आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेला यामुळे तात्काळ दिलासा मिळण्याची आशा आहे, असे 'लाईव्हलाँग वेल्थ'चे संस्थापक आणि संशोधन विश्लेषक हरीप्रसाद के. यांनी सांगितले.

सेबीकडून 'महत्त्वपूर्ण निर्देशांकां'ची नवीन नियमावली

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: भांडवली बाजाराची नियामक असलेल्या 'सेबी'ने नियामक आराखडा सादर केला असून, म्युच्युअल फंड योजनांद्वारे 'मानदंड' म्हणून वापरात असलेल्या ज्या निर्देशांकांची सलग सहा महिन्यांसाठी 'व्यवस्थापनाखालील सरासरी दैनंदिन एकत्रित मालमत्ता' (एयूएम) २०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे, अशा निर्देशांकांचे वर्गीकरण 'महत्त्वपूर्ण निर्देशांक' म्हणून केले जाईल, असे मंगळवारी जारी केलेल्या परिपत्रकाद्वारे तिने सूचित केले.

या निर्णयाचा उद्देश निर्देशांकांच्या व्यवस्थापनातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवणे हा आहे. ही गोष्ट पर्यायाने सामान्य गुंतवणूकदारांना त्यांनी गुंतवलेल्या पैशाचे काय होते हे समजण्यासाठीही मदतकारक ठरेल. उल्लेखनीय म्हणजे निर्देशांक प्रदात्या संस्थांनाही आता नोंदणी अनिवार्य ठरेल आणि त्यांच्यावर 'सेबी'चा वचक असेल.

सूचिबद्ध रोख्यांवर आधारित कोणताही 'मानदंड निर्देशांक', हा 'महत्त्वपूर्ण निर्देशांक' तेव्हाच मानला जाईल, जेव्हा म्युच्युअल फंड योजनांमधील त्या निर्देशांकाशी संबंधित 'सरासरी दैनंदिन एकत्रित मालमत्ता - एयूएम' ही, दरवर्षी ३० जून आणि ३१ डिसेंबर रोजी संपणाऱ्या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी २०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त असेल.

सेवा क्षेत्राची गतिमानता पाच महिन्यांच्या उच्चांकी

नवी दिल्ली : देशातील सेवा क्षेत्राला सरत्या एप्रिलमध्ये गती मिळाली असून, वाढीचा दर पाच महिन्यांतील उच्चांकी पातळीवर पोहोचला आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे सेवा प्रदात्यांचा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेऐवजी देशांतर्गत पुरवठादारांकडे कल वाढल्याने या क्षेत्राचा विस्तार झाल्याचे बुधवारी जाहीर झालेल्या मासिक सर्वेक्षणातून समोर आले.

भारतातील सेवा व्यवसायातील खरेदी व्यवस्थापकांचा कल दर्शविणारा 'एचएसबीसी इंडिया सर्व्हिसेस पीएमआय' निर्देशांक एप्रिल महिन्यात ५८.८ गुणांवर नोंदला गेला. मार्चमध्ये तो ५७.५ गुणांवर होता. निर्देशांकाची ही गेल्या नोव्हेंबरनंतरची उच्चांकी पातळी आहे. सेवा क्षेत्राचा निर्देशांक ५० गुणांवर नोंदला गेल्यास विस्तार तर ५० गुणांखाली नोंदला गेल्यास आकुंचन झाल्याचे मानले जाते. स्पर्धात्मक किमती, ई-कॉमर्स आणि देशांतर्गत वाढलेली मागणी यामुळे सेवा क्षेत्राची वाढ झाली आहे. चालू आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीच्या सुरुवातीला कंपन्यानी जास्त मनुष्यबळ भरती केली आहे.

बिर्ला यांच्या परतण्याने व्होडा-आयडियाला झळाळी



मुंबई: कर्जजर्जर बनलेल्या खासगी दूरसंचार कंपनी व्होडाफोन आयडियाचे बिगर-कार्यकारी अध्यक्ष म्हणून कुमार मंगलम बिर्ला यांनी बुधवारपासून पदभार स्वीकारला. आर्थिक आणि स्पर्धात्मक आव्हानांना तोंड देत असताना, बिर्ला यांचे व्यवस्थापनांत परतणे हे प्रवर्तकांचा कंपनीला पाठिंबा कायम असल्याचे द्योतक मानले जात आहे. नुकतेच 'एजीआर' थकबाकीत कपातीचा दिलासा मिळालेल्या कंपनीच्या भागधारकांसाठीही हे शुभसूचक ठरले.

कर्जबाजारी असलेल्या या दूरसंचार कंपनीसाठी हा नेतृत्वबदल महत्त्वाच्या टप्प्यावर झाला आहे. कंपनीने आगामी काळात निधी उभारणी, नेटवर्कमधील गुंतवणुकीला गती आणि कामकाज स्थिर करण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. ऑगस्ट २०२१ मध्ये, केंद्र सरकारला कंपनीत मालकी हिस्सा प्रदान करताना, कुमार मंगलम बिर्ला यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता.

व्होडाफोन आयडिया सुमारे २५,००० कोटी रुपयांच्या निधी उभारणीसाठी प्रयत्नशील आहे. कंपनीने याआधी २०२४ मध्ये फॉलो-ऑन पब्लिक ऑफरद्वारे (एफपीओ) १८,००० कोटी रुपये उभारले होते. रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेल यांसारख्या मोठ्या स्पर्धकांशी सामना करण्यासाठी कंपनीकडून, ४जी क्षमता वाढवण्यासाठी आणि ५जी सेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

'ईव्ही' विक्रीत तब्बल ७५ टक्क्यांची वाढ

पीटीआय, नवी दिल्ली

सरलेल्या एप्रिलमध्ये देशात, २३,५०६ इलेक्ट्रिक प्रवासी वाहनांची (ईव्ही) विक्री झाली असून, गेल्या वर्षातील याच महिन्याच्या तुलनेत त्यात ७५.१४ टक्के वाढ नोंदविण्यात आली, अशी माहिती फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डिलर्स असोसिएशनने (फाडा) बुधवारी दिली. गेल्या महिन्यात प्रवासी 'ईव्हीं'च्या विक्रीत टाटा मोटर्सने मोठी आघाडी राखली. टाटा मोटर्सने ८,५४३ वाहनांची विक्री केली गेली. गेल्या वर्षीच्या एप्रिलच्या तुलनेत त्यात ७७.१७ टक्के वाढ झाली आहे. त्यानंतर महिंद्र अँड महिंद्र ५,४१३, जेएसडब्ल्यू एमजी मोटार इंडिया ५,००६ अशी विक्री आहे. गेल्या वर्षातील याच महिन्याच्या तुलनेत त्यांच्या विक्रीतील वाढ अनुक्रमे ६३.९८ टक्के आणि ३२.५४ टक्के अशी आहे, असे 'फाडा'ने म्हटले आहे.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: www.mcxccl.com

३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही व वार्षिक लेखापरीक्षित आर्थिक परिणामांचे सार

(₹ लाखांमध्ये; प्रत्येक समभागाच्या माहिती व्यतिरिक्त)

तपशील	संपलेली तिमाही ३१ मार्च, २०२६ लेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर, २०२५ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ मार्च, २०२५ लेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२६ लेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२५ लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	१६,४८८	१२,१३०	६,००७	४२,५८९	२३,८९७
२. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर, अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींपूर्वी)	१३,६०२	९,५१९	३,२८१	३२,०७९	१४,३३६
३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींनंतर)	१३,६०२	९,५१९	३,२८१	३२,०७९	१४,३३६
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींनंतर)	१२,२५९	९,५२८	३,२९२	३०,७४२	१४,३२७
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	१२,२७६	९,५३१	३,२९०	३०,७४४	१४,२९७
६. समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	–	–	–	३,३५८	(३,९८६)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)* मूलभूत आणि सौमिकृत (₹):	५.११	३.९७	१.३७	१२.८१	५.९७

* अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.

नोंद:
१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.
२. वरील निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले असून, संचालक मंडळाने ६ मे २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत त्यास मान्यता दिली आहे.

संपूर्ण वित्तीय निष्कर्ष पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा
किंवा: https://www.mcxccl.com/disclosures/financial-results ला भेट द्या.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
ऋषि नथानी
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी
DIN : 00999139

स्थळ: मुंबई
दिनांक: ०६ मे २०२६

नॅशनल बँक फॉर फायनान्सिंग इन्फ्रास्ट्रक्चर अँण्ड डेव्हलपमेन्ट

(पार्लमेन्टच्या अॅक्टद्वारे प्रस्थापित एक विकास वित्तीय संस्था,
दि नॅशनल बँक फॉर फायनान्सिंग इन्फ्रास्ट्रक्चर अँण्ड डेव्हलपमेन्ट अॅक्ट, २०२१)

कार्यालय: द कॅपिटल, ए-विंग, १५वा मजला-१५०३, जी ब्लॉक, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
टेलि. : (०२२) ४१०४२०००; वेबसाइट : www.nabfid.org

३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठी लेखापरीक्षित वित्तीय परिणाम

(₹ कोटींत)

अ. क्र.	तपशील	संपलेले तिमाही			संपलेले वर्ष	
		३१.०३.२०२६ (लेखापरीक्षित)#^	३१.१२.२०२५ (विनालेखित)	३१.०३.२०२५ (लेखापरीक्षित)#^	३१.०३.२०२६ (लेखापरीक्षित)	३१.०३.२०२५ (लेखापरीक्षित)
१	प्रवर्तनाकडील एकूण उत्पन्न	२,२३२.३७	१,८७८.३९	१,४९८.५८	७,५८५.१२	५,२०८.३४
२	कालावधीतील निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम्स पूर्व)	७७४.०२	७७६.७१	६००.१७	३,०३६.६७	२,१९१.०२
३	करापूर्वी कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम्स पश्चात)	७७४.०२	७७६.७१	६००.१७	३,०३६.६७	२,१९१.०२
४	करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम्स पश्चात)	७७४.०२	७७६.७१	६००.१७	३,०३६.६७	२,१९१.०२
५	कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीकरिता समाविष्ट नफा/(तोटा) (करानंतर) आणि अन्य व्यापक उत्पन्न (करानंतर)]	नोंद ४ पाहा				
६	भरणा केलेले समभाग भांडवल	२०,०००.००	२०,०००.००	२०,०००.००	२०,०००.००	२०,०००.००
७	राखीव (मागील वर्षाच्या ताळेबंदानुसार) (पुनर्मुल्यांकन राखीव आणि भारत सरकारकडून मिळालेले अनुदान वगळून)	–	–	–	१४,४१८.९८	११,००४.५०
८	सिक्युरिटीज प्रीमियम (खाते)	–	–	–	–	–
९	निव्वळ संपत्ती	३४,२६०.१७	३३,४५९.०२	३०,९६७.१०	३४,२६०.१७	३०,९६७.१०
१०	भरणा केलेले ऋण भांडवल/ थकीत ऋण	१,०६,१७०.७४	६६,४१०.७०	४८,३०१.७२	१,०६,१७०.७४	४८,३०१.७२
११	थकीत विमोचनीय अधिमान भाग	–	–	–	–	–
१२	ऋण समभाग गुणोत्तर	३.१९	२.०७	१.६२	३.१९	१.६२
१३	प्रति समभाग कमाई (रु. १०/- प्रत्येकी)					
	मूलभूत: (अवार्षिकीकृत)	०.३९	०.३९	०.३०	१.५२*	१.१०*
	तनुकृत: (अवार्षिकीकृत)	०.३९	०.३९	०.३०	१.५२*	१.१०*
१४	भांडवल विमोचन राखीव	–	–	–	–	–
१५	ऋणपत्रो विमोचन राखीव	–	–	–	–	–
१६	ऋण सेवा व्याप्ती गुणोत्तर	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही
१७	व्याज सेवा व्याप्ती गुणोत्तर	१.८०	१.८४	१.८१	१.८३	१.८५

*वार्षिकीकृत

नोंदी :-

१ वरील विवरण सेबी (सूचीबद्धता अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) नियम, २०१५ मधील नियम ५२ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसकडे दाखल करण्यात आलेल्या सविस्तर स्वरूपातील वित्तीय परिणामांचा गोषवारा आहे. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाचा सविस्तर स्वरूपातील वित्तीय परिणाम स्टॉक एक्सचेंज(स)च्या व संस्थेच्या वेबसाईटवर (www.bseindia.com, www.nseindia.com आणि www.nabfid.org) उपलब्ध आहेत आणि खालील क्विक रिस्पॉन्स कोड स्कॅन करूनही पाहता येऊ शकते.

२ सेबी (सूचीबद्धता अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) नियम, २०१५ च्या नियम ५२ (४) मध्ये संदर्भित इतर लाइन आयटम्सचे समर्पक खुलासे स्टॉक एक्सचेंज (बीएसई आणि एनएसई) ला करण्यात आले आहेत आणि ते स्टॉक एक्सचेंज वेबसाइटवरून www.bseindia.com आणि www.nseindia.com मिळवता येऊ शकतात.

३ संचालक मंडळाच्या लेखापरीक्षण समितीने वरील आर्थिक निकालांचे पूनरावलोकन आणि शिफारस केली आहे आणि संचालक मंडळाने त्यांच्या ५ मे २०२६ रोजी झालेल्या सभेत त्यास मान्यता दिली आहे. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाचा परिणामांचा वैधानिक लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण केले आहे ज्यांनी त्यावर एक असुधारित लेखापरीक्षण अहवाल जारी केला आहे.

४ एकूण व्यापक उत्पन्न आणि अन्य व्यापक उत्पन्न या संबंधित माहिती "इंड एएस" अजून लागू केले नसल्यामुळे सादर केलेली नाही.

५ ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीचे आकडे हे वित्त वर्ष २०२५-२६ साठीच्या लेखापरीक्षित आर्थिक विवरणे आणि डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या नऊ महिन्यांसाठी प्रसिद्ध केलेल्या अप्रमाणित आकडेवारीनुसार संतुलित आकडे आहेत. त्याचप्रमाणे, ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे आकडे हे वित्त वर्ष २०२४-२५ साठीच्या लेखापरीक्षित आर्थिक विवरणे आणि डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या नऊ महिन्यांसाठी प्रसिद्ध केलेल्या अप्रमाणित आकडेवारीनुसार संतुलित आकडे आहेत.

६ मागील कालावधीची आकडेवारी चालू कालावधीच्या स्पष्टीकरणीशी अनुरूप जेथे आवश्यक तेथे विचाराधीन पुर्नगठीत/पुनर्वर्गीकृत करण्यात आली आहे.

संचालक मंडळाच्या वतीने आणि करिता

स्थळ : मुंबई
दिनांक : ०५ मे २०२६

स्वाक्षरी/-
बी. एस. वेंकटेशा
डीएमडी - सीआरओ

स्वाक्षरी/-
सैमुअल जोसेफ जेबराज
डीएमडी - एल एंड पीएफ

स्वाक्षरी/-
मोनिका कालिया
डीएमडी - सीएफओ

स्वाक्षरी/-
राजकिरण राय जी.
व्यवस्थापन संचालक

EXPRESS Careers

NICMAR UNIVERSITY, PUNE
25/1, N.L.A. Post Office, Balewadi, Pune 411 045,
Enacted under the Maharashtra Private Universities (Establishment and Regulation) Act, 2023

ADVERTISEMENT FOR THE POST OF VICE CHANCELLOR

The Search-Cum-Selection Committee invites more applications through this public notification or nomination or Talent Search for the post of Vice Chancellor, in extension of the advertisement published in leading newspapers on 13th March 2026 and in accordance with clause 7.3 of the UGC Regulations dated 18th July 2018.

Details regarding job description, eligibility criteria, general instruction and the online application process are available at: www.nicmar.ac.in/pune-campus/careers

Revised Last Date for Application/Nomination/Talent Search: 15th May 2026.

Candidates who applied under the earlier advertisement dated 13th March 2026 need not reapply.

Search Cum Selection Committee

THE BOMBAY SALESIAN SOCIETY'S
DON BOSCO COLLEGE
Premier Automobiles Road, Kurla (W), Mumbai - 400 070.

MINORITY
APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FROM THE ACADEMIC YEAR 2026-2027
UN-AIDED

Sr. No.	Cadre	Subject	Total No. of Posts	Category
1	Principal	–	01	01 - OPEN
2	Assistant Professor	Management Studies	01	01 - OPEN
3	Assistant Professor	Multimedia and Mass Communication	01	01 - OPEN

The above posts are open to all, however candidates from any category can apply for the post.
Reservation for women will be as per **University Circular No. BCC/16/74/1998 dated 10th March, 1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC/2019-20/05 dated 05th July, 2019.**
Candidates having knowledge of Marathi will be preferred.
"Qualification, Pay Scales and other requirement are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018, Government of Maharashtra Resolution No. Misc-2018/C.R.56/18/UNI-1, dated 8th March, 2019 and University circular No. TAAS/(CT)/ICD/2018-19/1241, dated 26th March, 2019 and revised from time to time"
The Government Resolution & Circular are available on the website mu.ac.in
Applicants who are already employed must send their application through proper channel. Applicants are required to account for breaks, if any in their academic career.
Application with full details should reach the **Rector / Director, The Bombay Salesian Society's, DON BOSCO COLLEGE, 'D' Wing, 3rd Floor, Premier Automobiles Road, Kurla (W), Mumbai - 400 070.** within 15 days for the date of publication of this advertisement.
This is University approved advertisement.
Sd/-
Rector/Director

VASAI VIKAS SAHAKARI BANK LTD,
(Scheduled Bank)
We invite applications from the eligible aspirants for the post of: -

CHIEF EXECUTIVE OFFICER - No of Post 1

Qualifications: The candidate shall be a **Graduate** and possess any one of the following qualifications, as prescribed by RBI:CAIIB / DBF / Diploma in Co-operative Business Management or equivalent, ORChartered Accountant (CA) / Cost Accountant (ICWA), ORPost-Graduate Degree in any discipline.
Experience: Minimum 15 years of banking experience, out of which at least 8 years shall be at senior management level in a bank / financial institution.
Age: Preferably not less than 50 years and not more than 60 years as on the date of appointment.

GENERAL MANAGER/ Dy. GENERAL MANAGER No of Post 1

Qualifications: The candidate shall be a Graduate Post-Graduate Degree/CAIIB / MBA / ICWA / CA will be preferred.
Experience: Minimum 15 years of banking experience, with at least 8 years shall be at middle or senior management level in a bank/Finacial institution.
Age: Not more than 55 years as on the date of appointment.

General Conditions:

Good computer knowledge is mandatory.
Salary and perquisites shall be commensurate with qualifications, experience, and last drawn remuneration.
Appointment shall be subject to fulfillment of eligibility criteria, fit and proper norms, and approval as prescribed by the Reserve Bank of India.
Selected candidates must be declared medically fit as per the Bank's rules.

Interested candidates fulfilling the eligible criteria may apply with their latest Resumes within 10 days to:

CHIEF EXECUTIVE OFFICER
Vasai Vikas Sahakari Bank Ltd, (Scheduled Bank).
Head Office, Opp. Chimaji Appa Ground, Near Vasai Depot
Vasai (W), Dist. - Palghar 401 201.
Email ID-hrd@vasaivikasbank.co.in
Note: The Bank reserves the right to accept or reject any or all applications, modify eligibility criteria, or cancel the recruitment process at any stage without assigning any reason.
Recruitment and selection shall be carried out strictly in accordance with RBI guidelines and the Bank's internal policies.